पदविका [डी. एच. एम. एस. ] होमिओपॅथी महाविद्यालयास [बी. एच. एम. एस. ] पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.
शासन निर्णय क्र. एचईडी–१४९१/११९४/१७०/९१/एमईडी–७.
मंत्रालय, मुंबई–४०००३२.
दिनांक:१३:मार्च:१९९२.

---

**शासन निर्णय:–** राज्यातील काही पदविका होमिओपॅथी महाविद्यालयात पदवी पाठ्यक्रम [बी. एच. एम. एस. ] सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता. सदर प्रस्तावावर सर्वांगीण विचार करुन केंद्रीय होमिओपॅथी परिषद नवी दिल्ली यांनी विहित केलेला बी. एच. एम. एस. [होमिओपॅथी] हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील होमिओपॅथी महाविद्यालयांना १९९१–९२ या वर्षापासून शासन मान्यता देण्यात येत आहे. ही मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे. सदर अटींची पूर्तता करणे आहे. तसेच सदर अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी संबंधीत विद्यापीठाकडे संलग्नीकरण करण्यात यावे.

१. मोहिनी होमिओपॅथीक ॲन्ड चॅरिटेबल सोसायटी, राजापेठ, अमरावती.
२. पंचशील होमिओपॅथीक शिक्षण प्रसारक मंडळ, खामगांव, जि. बुलढाणा.
३. श्री. नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम, [जैन गुरुकुल] मु. पो. नेमिनगर, चांदवड जि. नासिक.
४. श्री. गुरु गणेश स्थानकवाशी जैन शिक्षण समिती, श्री. गुरु गणेश नगर, औरंगाबाद.
५. डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्ट, होमिओपॅथीक कॉलेज, जयसिंगपूर.
६. होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, अकोट रोड, अकोला.

२. या संस्थांना पदविका आणि पदवी असे दोन अभ्यासक्रम चालू ठेवता येणार नाहीत. पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यापूर्वी पदविका अभ्यासक्रम बंद करण्यात यावा. पदविका अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही.

३. या महाविद्यालयांना महाराष्ट्र शासनाकडून कुठल्याही प्रकारचे अनुदान दिले जाणार नाही.

४. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश देताना महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी घेऊ नये.

५. जे विद्यार्थी महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळाची व उच्च माध्यमिक मंडळाची परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा विद्यार्थ्यांनाच सदर परीक्षेतील गुणवत्तेनुसार पदवी अभ्यासक्रमात प्रवेश देण्यात यावा.

Dr. Mohd. Furqan Mohd. Yusuf
DEAN
DKMM Homoeopathic Medical College & Hospital, Aurangabad

६. मागासवर्गीयांना प्रवेश देताना खालीलप्रमाणे आरक्षणाच्या टक्केवारीची अंमलबजावणी करावी. तसेच अशा विहीत जागा भरताना ठरावीक फीच्या व्यतिरिक्त आर्थिक रक्कम घेतली जाणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष पुरवावे.

| अनु. क्र. | वर्गवारी | आरक्षित जागेची टक्केवारी. |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती ज्या बौद्ध धर्मास रुपांतरीत झाल्या आहेत. | १३% |
| २. | अनुसूचीत जमाती [निर्दिष्ट क्षेत्राच्या बाहेर रहाणा-यासह] | ७% |
| ३. | विमुक्त जमाती आणि भटक्या जमाती | ४% |
| ४. | इतर मागासवर्गीय जाती | १०% |
| | एकूण : | ३४% |

७. सदर महाविद्यालयाचे स्वत:चे सुसज्ज व उपकरणे इत्यादींसह प्रमाणित शय्येचे रुग्णालय असावे व त्यामध्ये केंद्रीय होमिओपॅथी परिषदेने विहित केलेल्या प्रमाणकांची परिपूर्ती असावी.

८. केंद्रीय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्लीने विहित केलेला पूर्णवेळ अध्यापक वर्ग नेमावा.

९. संस्थेने पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी, शिक्षक, रुग्णालय कर्मचारी वर्ग व उपकरणे इत्यादी बाबतीत जर काही कमतरता असेल तर ती भरुन काढली पाहिजे.

१०. संस्थेचे स्वत:चे परिपूर्ण सुसज्ज असे शरीररचना, शरीरक्रिया शास्त्र तत्त्व शास्त्र व औषधी निर्माण शाळा इत्यादी विभाग व अत्यावश्यक कर्मचारी वर्ग तसेच उपकरणे साहित्य इत्यादी पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी असावेत.

११. होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रमावर होणारा आवर्ती आणि अनावर्ती खर्च स्वत: संस्थेने सोसून पुरेशा निधी अभावी विद्यापीठीय स्तरावर शैक्षणिक दर्जावर विपरीत परिणाम होणार नाही याची संस्थाने कटाक्षाने दक्षता घ्यावी.

१२. संबंधीत विद्यापीठ सदर पदवी अभ्यासक्रमासाठी जी प्रवेश क्षमता ठरवून देईल त्या प्रवेश क्षमतेचे काटेकोरपणे पालन करावे व कोणत्याही परिस्थितीत त्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा पदवी अभ्यासक्रमाची मान्यता काढून घेण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सु. श्री. कंटक )
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

-३-

Dr. Mohd. Furqan Mohd. Yusuf
DEAN
DKMM Homoeopathic Medical
College & Hospital, Aurangabad

# MARATHWADA UNIVERSITY

Telephones Office P. A. } 24431 to 24437
Registrar's Resi. : 24703
Registrar's Office : 24104
Tele. Ad. MARATHSITY

University Campus,
AURANGABAD-431 004
(Maharashtra)

*Ref. No.* Acad/Affil/92-93/ 27190-192

Date August 3, 1992

The Secretary to the
Government of Maharashtra,
Education and Employment Department,
Mantralaya Annexe,
B O M B A Y - 400 032.

Subject:- Affiliation for under-Graduate Courses, Continuation/extension of affiliation of the Dakshin Kesari Muni Mishrilalji Homoeopathic Medical College, Aurangabad from June, 1992.

Ref:- Government letter No.NGC 1092/(5116) Vishi-2 dated 14-5-1992.

Sir,

I have the honour to state that according to Section43(6) of the Marathwada University Act 1974, the Registrar shall submit the application and all proceedings of the Academic and Executive Council to the Senate, and the Senate shall, after such further inquiry as it may think necessary, record its resolution, which shall be forwarded to the Government together with all proceedings, for deciding to grant or reject the applications in part or in whole, I am accordingly enclosing a copy of the application alongwith two copies of Appendix'A' showing the teaching Courses of study for under-graduate Courses which the above named homoeopathic College has requested for new affiliation from June, 1992.

The Executive Council of this University had appointed a local Inquiry Committee to report on the application. The Vice-Chancellor has accepted the recommendations of the said local Inquiry Committee with admissions of the 75 seats on certian conditions on behalf of the Academic Council, Executive Council and the Senate under the provisions of Section 11(4) of the Marathwada University Act, 1974 in the matter of affiliation and recorded his opinion that the affiliation of the above named Homoeopathic College to the University be granted initially for a period of one year w.e. from June, 1992 as per the recommendations of the Local Inquiry Committee for teaching Courses of Study mentioned in Appendix 'A' subject to the fulfilment of the conditions stated therein to the satisfaction of the University.

...2/-

MARATHWADA UNIVERSITY

Tel. } 24431 to 24437
Registrar's Resi. : 24703
Registrar's Office : 24104
Tele. Ad MARATHSITY

University Campus,
AURANGABAD-431 004
(Maharashtra)

Ref. No. Date . . . .



The College authorities are being requested to give an undertaking in regard to the fulfilment of the conditions laiddown by the University for affiliation. The University will take necessary steps to satisfy itself about the actual fulfilment of the conditions. I am therefore, directed to request you to issue Government Notification in this regard.

The receipt of this letter may please be acknowledged.

Encl: As above

Yours faithfully,

Sd/-

Registrar.

1. Copy forwarded with compliments alongwith copies of application, proceedings (Appendix 'A') and the extract of the Local Inquiry Committee Report, to the Director of Education (Higher Education), Maharashtra State, Poona-1 for information.

2. Copy alongwith a copy of appendix 'A' is forwarded with compliments to the Principal, Dakshin Kesari Muni Mishrilalji Homoeopathic Medical College, Caves Road, Aurangabad with a request to forward the undertaking regarding the fulfilment of conditions to the undersigned by return of post.

Registrar.

SR/-*

Dr. Mohd. Furqan Mohd. Yusuf
DEAN
DKMM Homoeopathic Medical
College & Hospital, Aurangabad